# संयुक्त राष्ट्रसंघ दिवस

ऑलिव्ह रेब, चित्रे व सजावट : अलिकि

अनुवाद : सुजाता गोडबोले



# संयुक्त राष्ट्रसंघ दिवस

२४ ऑक्टोबर ही एक नवी सुटी असली तरी ती फार महत्त्वाची आहे. संयुक्त राष्ट्रसंघाचा तो जन्मदिवस. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक शांतीसाठी आणि आपले जग अधिक चांगले असावे यासाठी काम सुरु केले.

‘संयुक्त राष्ट्रसंघ दिवस’ या पुस्तकात सॅन फ्रान्सिस्को येथील संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेची आणि ज्या आशेने मानवतेच्या कल्याणासाठी त्याची स्थापना करण्यात आली त्याची आणि त्याच्या जगभरातील कार्याची माहिती देण्यात आली आहे.

भूक, रोगराई, अज्ञान यांचे निर्मूलन करण्यासाठी व विशेषतः जागतिक शांततेचे रक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ जगभरातील लोकांसाठी मोलाचा ठरला आहे.

ऑलिव्ह रेब यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या गुंतागुंतीच्या कार्याबाबत सोप्या व सरळ भाषेत लिहिले असून आपण आशा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ दिवस का साजरा करतो हे स्पष्ट केले आहे.

# संयुक्त राष्ट्रसंघ दिवस



ऑलिव्ह रेब, चित्रे व सजावट : अलिकि

अनुवाद : सुजाता गोडबोले

२४ ऑक्टोबर हा एक जन्मदिवस आहे.

जगभरातील शांतता टिकून राहण्यासाठी हा सर्वाधिक आशेचा दिवस आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाचा हा जन्मदिवस आहे.



या दिवशी आपण केकवर लावलेल्या मेणबत्त्या मोजत नाही.

आपण ध्वज मोजतो.

शंभराहून अधिक ध्वज आपल्याला दिसतील.

आता संयुक्त राष्ट्रसंघात शंभराहून अधिक देशांचा अंतर्भाव होतो. इंग्रजीत संयुक्त राष्ट्रसंघाचे 'युएन' हे लघुरूप अधिक प्रचलित आहे.

न्यूयॉर्कमधील 'युनायटेड नेशन्स प्लाझा' या ठिकाणी हे देश दरवर्षी भेटतात. शांततेसाठी काम करण्यासाठी ते भेटतात.

आपले जग अधिक चांगले बनविण्यासाठी ते भेटतात.

या चौकातील संयुक्त राष्ट्रसंघाच्या काचेच्या उंच इमारतीसमोर विविध देशांचे हे ध्वज फडकत असतात.



संयुक्त राष्ट्रसंघाचे अद्याप खूप जन्मदिवस झाले नाहीत.

संयुक्त राष्ट्रसंघाचा जन्म १९४५ मध्ये झाला.

जगभरातील लोक युद्धाने त्रासले होते म्हणून राष्ट्रसंघाची स्थापना झाली.

त्यांना शांततेत जगायचे होते.

१९४५ सालच्या वसंत ऋतूत ५० देशांचे प्रतिनिधी सॅन फ्रान्सिस्कोमध्ये जगाच्या शांततेचा आराखडा बनवण्यासाठी जमले.

प्रशांत महासागरात दुसरे जागतिक युद्ध अद्याप चालू होते.

आकाशात विमाने घोंघावत होती.

त्यातून बॉम्ब टाकले जात होते.

मोठमोठी शहरे उद्ध्वस्त होऊन जळत होती.



सॅन फ्रान्सिस्को मध्ये जमलेले प्रतिनिधी म्हणाले:

प्रत्येक युद्ध हे पहिल्यापेक्षा अधिक भयानक होत आहे.

आणखी एक जागतिक युद्ध झाले तर आपल्या आवडत्या जगाचा अंत होईल.

यापुढे परत युद्ध होऊच नये.

ते आणखी म्हणाले:

कोणताही एक देश जगात शांतता स्थापन करू शकणार नाही.

अनेक देशांनी एकत्रितपणे यासाठी काम केले पाहिजे.

आपण जगाच्या शांततेसाठी एक आराखडा तयार करायला हवा.



म्हणून मग ५० देशांच्या प्रतिनिधींनी संयुक्त राष्ट्रसंघाचा एक आराखडा तयार केला.

त्यानुसार काम सुरु करण्यासाठी पुरेशा देशांची मान्यता मिळेपर्यंत हिवाळा जवळ आला.

झाडांची पाने गळू लागली होती आणि पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करू लागले होते.

२४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाचे कामकाज सुरु झाले.

जगातील सर्वांनी आभार मानले.

जागतिक शांततेसाठी ही सर्वाधिक आशादायी घटना आहे असे ते म्हणू लागले.

हा एका नव्या युगाचा प्रारंभ आहे
असेही ते म्हणू लागले.





वेगवेगळ्या देशांमधील ज्या वादांमुळे युद्ध होऊ शकेल असे वाद निस्तरणे ही त्यांच्या कामाची एक पद्धत आहे.

प्रत्येक बाजूचे म्हणणे ते ऐकून घेतात.

कोणाचे म्हणणे खरे आहे ते ठरवतात.

मग वाद मिटवतात.

शांततेसाठी काम करण्याची त्यांची आणखी एक पद्धत म्हणजे सर्व देशांनी एकमेकांना मदत करायची.

श्रीमंत आणि गरीब देश, मोठे व लहान देश - सर्व येथे एकत्रितपणे काम करतात.

राष्ट्रसंघ आणखीही काहीतरी करतो.

जग अधिक चांगले व्हावे यासाठी येथे प्रयत्न केला जातो.

कोणीही भुकेले राहू नये!

रोगराई कमी व्हावी!

सर्वांना लिहिता वाचता यावे!

हजारो लोक वर्षभर संयुक्त राष्ट्रसंघात काम करतात.

ते निरनिराळ्या भाषा बोलतात.

ते वेगवेगळ्या प्रकारचे कपडे घालतात.

अनेक गोष्टी कशा कराव्यात हे त्यांना माहित आहे.

त्यातील काही जण न्यूयॉर्कमधील काचेच्या उंच इमारतीत काम करतात.

ज्या देशांना मदतीची गरज आहे अशा देशांमध्ये अनेक लोक काम करतात.



जगभरातील अर्धे लोक उपाशी असल्याने त्यांना मदतीची गरज आहे.

पुरामुळे त्यांची पिके वाहून जातात.

दुष्काळात शेते वाळून जातात.

जमीन निकस असल्यानेही पीक कमी येते.

पूर येऊ नयेत म्हणून संयुक्त राष्ट्रसंघ धरणे बांधण्यासाठी मदत देते.

शेतांसाठी पाणी मिळावे म्हणूनही ते मदत करतात.

जमिनीचा कस सुधारण्यासाठीही ते मदत देतात.





लहान मुले-मुली आपले कप घेऊन येतात.

ते रिकामे आहेत.

लहान मुले-मुली आपल्या वाट्या घेऊन येतात.

त्या देखील रिकाम्या आहेत.



म्हणून मग संयुक्त राष्ट्रसंघ भुकेल्या मुलांसाठी दूध पाठवते.

तांदूळ, मका आणि गव्हाचे जास्त पीक मिळावे यासाठी ते शेतकऱ्यांना शिक्षण देण्यास मदत करतात.



जगातील अर्ध्या लोकांना आजारपणात मदतीची गरज असते.

ते मागे पडतात. त्यांना कामावर जाता येत नाही.

लहान मुला-मुलींना पळता आणि खेळता येत नाही.

म्हणून संयुक्त राष्ट्रसंघ रोगराई घालवण्याचा प्रयत्न करते.

ते डॉक्टर आणि परिचारिका पाठवतात.

ते औषधेही पाठवतात.

लोकांना निरोगी आणि तंदुरुस्त होण्यासाठी ते मदत करतात.

आपल्या देशातील (अमेरिकेतील) मुले-मुलीही मदत करतात.

हॅलोविनच्या दिवशी ते भुते आणि हडळी सारखे कपडे घालतात.

ते लोकांच्या घरांच्या घंटा वाजवतात.

पण ते आपल्या स्वतःसाठी खाऊ मागत नाहीत.

ते भुकेल्या आणि आजारी मुलांना मदत करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुलांच्या निधीसाठी देणग्या गोळा करतात.





जगातील अर्ध्या लोकांना मदतीची गरज असते कारण त्यांना लिहिता वाचता येत नाही.

त्यांना शिकण्याची इच्छा तर असते, पण त्यांना शाळेत जाण्याची संधीच मिळालेली नसते.

त्यांनी कधी पुस्तक पाहिलेले नसते.

म्हणून संयुक्त राष्ट्रसंघ शाळा बांधण्यासाठी मदत देते.

ते शिक्षकही पाठवतात. ते पुस्तके आणि कागद-पेन्सिली पाठवतात.

त्यामुळे मुला-मुलींना लिहायला आणि वाचायला मदत होते.

मग ते त्यांच्या आई-वडिलांना देखील शिकवतात.

जगातील बहुतेक लोकांच्या त्वचेचा रंग
गडद असतो.

हा रंग केवळ त्वचेपुरताच मर्यादित असतो
हे संयुक्त राष्ट्रसंघाला माहित आहे.

कोणत्याही वंशाचे लोक जन्मतः
अधिक चांगले वा अधिक हुशार नसतात.

त्यासाठी प्रत्येकाला एका संधीची
आवश्यकता असते.







त्वचेचा रंग कोणताही असला तरी आपल्या सर्वांच्या भावना सारख्याच असतात.

आपण हसतो. रडतो. नाचतो. गातो.

आपल्याला आपल्या मित्रांबरोबर खेळायला आवडते.

काही वेळा एकट्यानेच बसून स्वप्न पाहायलाही आपल्याला आवडते.

म्हणून त्वचेचा रंग काळा, गोरा, निमगोरा किंवा पिवळा, कसाही असला, तरी सर्वांना समान संधी मिळावी हा संयुक्त राष्ट्रसंघाचा प्रयत्न असतो.

थोड्याच वर्षांत संयुक्त राष्ट्रसंघाने बरेच कार्य केले आहे.

अनेक देशांतील वाद संपवले आहेत.



कोट्यवधी भुकेल्यांना खाऊ घातले आहे.



कोट्यवधी आजारी लोकांना बरे केले आहे.



कोट्यवधी मुला-मुलींना लिहायला
व वाचायला शिकवले आहे.



शांततेसाठी त्यांनी मोठे कार्य केले आहे.

गोरे नसणाऱ्या लोकांना नवी
आशा दाखवली आहे.







म्हणून मुले आणि मुली शाळेत संयुक्त राष्ट्रसंघ दिवस साजरा करतात यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

शाळेतील कार्यक्रमात ते संयुक्त राष्ट्रसंघाच्या जन्मदिवसाबाबत बोलतात.

आतापर्यंत संयुक्त राष्ट्रसंघाने केलेल्या कार्याची माहिती देतात.

भविष्याविषयीच्या त्यांच्या आशा-आकांक्षासंबंधीही बोलतात:

युद्धबंदी घडवून जगात शांतता नांदवणे.

जगात सुधारणा घडवून शांततेचा प्रसार करणे.



## लेखकासंबंधी

ऑलिव्ह रेब यांनी शिकागो विद्यापीठातून पदवी घेतल्यानंतर 'नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटी लॉ स्कूल' मधून एलएलबी ही पदवी मिळवली. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात त्या वकिली करत असत.

इलिनॉय राज्यातील शिकागो शहरातून आलेल्या ऑलिव्ह यांनी 'झिमरिंग व रेब' या भागीदारी कंपनीतून १५ वर्षे शिकागोत वकिली केली. न्यायालयाच्या इतिहासातील महत्त्वाच्या ठरलेल्या रोसिका श्विमर नागरिकत्वाच्या अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयातील खटल्यात त्यांचा सहभाग होता.

श्रीमती रेब कामगार कार्यालयात भाषणे देत असत आणि 'रिडर्स डायजेस्ट'सह अनेक मासिकांमध्ये त्यांनी कायदेविषयक लेख लिहिले आहेत.

'युनायटेड नेशन्स प्लेज अँड प्रोग्रॅम्स' व 'पेट्रीयॉटिक प्लेज अँड प्रोग्रॅम्स' या लहान मुलांच्या नाटकांच्या दोन खंडांच्या त्या सहलेखिका आहेत. आता त्या कोलोरॅडो राज्यातील बोल्डर येथे राहतात. गिर्यारोहण व पायी प्रवास हे त्यांचे छंद आहेत.

## चित्रकारासंबंधी

अलिकी या उपयोजित कला आणि पुस्तकांची सजावट यातील तज्ञ् आहेत. त्याखेरीज त्यांना संगीत, पुस्तके आणि बागकाम यातही स्वारस्य आहे.

अलिकी यांचे बालपण फिलाडेल्फिया राज्यात गेले. त्या म्युझियम कॉलेज ऑफ आर्टच्या विद्यार्थिनी आहेत. त्यांनी युरोपमध्ये भरपूर प्रवास केला असून त्यात कलाकार या नात्याने स्वित्झर्लंडमध्ये चार वर्षे वास्तव्यास असताना चित्रे रेखाटण्यासाठी मोटारीतून केलेल्या प्रवासाचाही समावेश होतो. या दरम्यान त्यांनी इटली, युगोस्लाव्हिया व ग्रीसमध्येही प्रवास केला. वास्तव आयुष्यात अलिकी या श्रीमती फ्रॅन्झ ब्रान्डेनबर्ग या नावाने ओळखल्या जातात. त्या व त्यांचे पती न्यूयॉर्कमध्ये राहतात.

**समाप्त**